# १०वी-१२वी निकालाचे-मार्कांचे टेन्शन नको ॲक्शन घ्या...

महाराष्ट्रातील माझ्या लाडक्या व हुशार पोरांनो! १०वीचे निकाल जवळ येत चाललेत आणि प्रत्येकाच्याच मनात त्या विषयीची एक अनामिक हुरहूर लागली असेल, त्यात वावगं काहीच नाही...वर्षभर तुम्ही जीव तोडून अभ्यास करून पेपर लिहिले असतील आणि आता त्याविषयीची निकालाची उत्सुकता असणे साहजिकच आहे...इथपर्यंत ठीक आहे...पण जर टेन्शन जातच नसेल तर मात्र यापुढच वाचा. मला खात्री आहे तुमच टेन्शन कुठल्या कुठे पळून जाईल! समजा तुम्हाला अपेक्षेपेक्षा कमी मार्क मिळाले तर काय-काय होऊ शकतं ते आपण बघूया...तुम्हाला सायन्स किंवा कॉमर्सला प्रवेश मिळणार नाही...कदाचित हवं ते कॉलेजही मिळणार नाही...मग तुम्हाला आर्ट्स मध्येच प्रवेश घ्यावा लागेल आणि एखाद्या खूप नामांकित नसलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल. पण त्याने तुमच्या करिअरवर काय परिणाम होईल ते बघू या. २०१२ च्या यु.पी.एस.सी.च्या परीक्षांचे निकाल नुकतेच लागले आहेत. त्यात पुण्यातील अमृतेश औरंगाबादकर हा विद्यार्थी १० व्या क्रमांकावर आहे. त्याच शिक्षण काय असेल? बी.एस्सी.? बी.काम.? की बी.ई.? तर तो झालाय फक्त बी.ए.! आणि तरी सुद्धा तो वयाच्या २२ व्या वर्षी भारतातील मानाची समजली जाणारी परीक्षा दणदणीतपणे व पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाला. मग तुम्हालाही कमी मार्क मिळालेत आणि तुम्ही आर्ट्स ला प्रवेश घेतला तर काही बिघडणार आहे का? नाहीना मग मार्कांचं टेन्शन कशाला घ्यायचं? पण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की अमृतेशने त्याला आय. ए. एस. व्हायचं ते १२वी पासूनच ठरवलं होतं. म्हणजे तुम्ही आर्ट्स, सायन्स, की कॉमर्स ला प्रवेश घेता हे तेव्हढ महत्वाचं ठरत नाही तर एकूणच तुम्ही तुमच्या करीअर विषयीचे निर्णय किती लवकर व अचूकपणे घेतात हे जास्त महत्वाचं ठरतं. म्हणूनच म्हटलंय की टेन्शन नको एक्शन घ्या. मला स्वतः ला करीअरच्या काय-काय संधी उपलब्ध आहेत याचा शोध घ्या...त्याही आधी स्वतःचा नैसर्गिक कल-आवड शोधा आणि त्यावर आधारित निर्णय घ्या म्हणजे अमृतेश सारखंच भव्य-दिव्य यश तुम्हीही मिळवू शकाल.

ही झाली कमी मार्कांची गोष्ट! समजा तुम्ही नापासच झालात तर? मित्रानो, १०वी-१२वी नापसांचा आकडा वर्षागणिक वाढत चालला आहे. २००९मध्ये ५.५ लाख, २०१०मध्ये ७ लाख आणि २०११ मध्ये ९ लाख... आणि आता येणाऱ्या निकालात कदाचित हा आकडा १० लाखांच्या वर जाण्याची शक्यता आहे...मग या नापासानी करावं तरी काय? तुम्हाला काही नापास मुलांची उदाहरण दिली तर कळेल की नापास मुलं करीअर मध्ये व आपल्या आयुष्यामध्ये काय? करू शकतात ते- महात्मा गांधी शालेय जीवनात एकदा व ब्यारीस्टरी शिकत असताना एका विषयात नापास झाले होते. भारताच्या व जगाच्याही इतिहासातले गांधीजींचे स्थान सर्वांनाच माहित आहे. जगाला अणुशक्तीची भेट देणारा शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन शालान्त परीक्षा न पास झाल्याने त्याला पुढील शिक्षणासाठीचा प्रवेश नाकारला गेला होता. पुढे त्याने अनेक शोध लावले व नोबेल पारीतोषाकाचा मानकरीही ठरला. महाराष्ट्राचे महाकवी कुसुमाग्रज हेही पदवी परीक्षेत एकदा नापास झाले होते. पण मग त्यांना चूक उमगली. त्यांना त्यांच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरवण्यात आलं होत. जगप्रसिद्ध गणितज्ञ रामानुजन याचं गणितावर अफाट प्रेम होतं. पण त्यामुळे इतर विषयांकडे त्याचं दुर्लक्ष्य झालं व पुढील शिक्षणाची गाडी अडली. त्यातून मार्ग काढून त्यांनी गणितात खूप मोठं नाव कमावलं. भारतातील इंग्रजी लेखकांमध्ये आर. के. नारायण याचं स्थान वरचं आहे. पण वाचून आश्चर्य वाटेल की ते एकदा नापास झालेले व तेही इंग्रजी या विषयात! मग सांगा एखाद्या वर्गात किंवा १०वी-१२वी च्या परीक्षात नापास झालं तर काय आयुष्य संपून जातं का? नाही ना? १०वी-१२वी नापासांसाठी करीअरच्या अनेक संधी व वाटा आहेत. १०वी-१२वी नापास सुद्धा आपलं करीअर घडवू शकतात प्रश्न असतो तो योग्य ते मार्गदर्शन मिळण्याचा व मिळवण्याचा!

आता आपण थोडासा ट्रॅक चेंज करू या. १२वी ला इंग्रजी विषयात "डोंट क्विट" नावाची कविता आहे. ही कविता जगप्रसिद्ध आहे आणि इंटरनेटवर या कवितेचे व्हीडिओज़ सुद्धा आहेत. गम्मत म्हणजे भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम, सुप्रसिद्ध लेखक शिव खेरा, सुप्रसिद्ध वक्ता आणि लेखक उमेश कणकवलीकर, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी अशा दिग्गज मंडळींनी या कवितेचा समावेश आपापल्या पुस्तकात केला आहे. त्यांचे वेगवेगळे मराठी अनुवाद सुद्धा आहेत. याच "डोन्ट क्विट" या कवितेचा स्वैर अनुवाद आहे "ध्येयशिखर" ही शब्दरचना...आपल्या प्रत्येकाच्या जीवनात काही ध्येये असतात, काही स्वप्नेसुद्धा असतात. ती साकारतांना अनेक अडचणींतून जाव लागतं...कधी कधी अपयश पण येतं, पण जिद्द आणि चिकाटी ठेऊन प्रयत्न केले तर आपण आपलं ध्येय साध्य करू शकतो हे या कवितेतून सांगितलं आहे... बघू या...कशी वाटते तुम्हाला हि शब्दरचना...

"ध्येयशिखर"

जीवनातील ध्येयाचे शिखर सर करीत असताना
संकटांचे वारे वाहतील, अडथळ्यांच्या खाच-खळग्यांतून वाटा चढावाच्या भासतील
बेरजा करू पहाल तर वजाबाक्या होतील आणि जरा हसू पहाल तर डोळे ओले होतील...
वाटेत दम लागला तर दम घ्या क्षणभर...पण नका सोडू धीर...
मित्रांनो !
रात्रीच्या गर्भातूनच होतो शेवटी उषः काल, जगी कोण नाही असा जो पाही दिक्काल...
वाटेल सुळका जरी दूरवर, कोणास ठाऊक पण असेल एका हातावर...
चिकटून राहा ध्येयाशी मार्गक्रमण करताना, भय-शंकेची वटवाघुळे माथ्यावर भिरभिरताना...
अपयश हे अल्प-यश नसे शेवट जीवनाचा, वादळ-वाटांवरती दिवा जळू दे आशेचा...
आणि मग भले कोसळू दे कडे संकटांचे, निश्चल, अविचल उभे ठाका
आणि धीर मात्र सोडू नका...कारण असे केले तर अंतिम विजय तुमचाच आहे...

काय कशी वाटली तुम्हाला ही शब्दरचना? जशी कोणत्याही आजाराची प्रतिबंधक लस असते. तशीच ही 'बी पोझीटीव'ची लस आहे. हवं तर 'भारुकाका.कॉम' या संकेतस्थळावरून ही शब्दरचना डाउनलोड करा व आपल्या खोलीत चिकटवा...

संशोधनाने असं सिद्ध झालंय की जी मुलं अपयशाने खचून न जाता जिद्द, चिकाटी आणि धीर धरतात ती मुलं करीअर मध्येच नाही तर जीवनातसुद्धा खूप यशस्वी होतात. तर मग टेन्शन लेनेका नै, ओ.के.? आता एयाक्शन विषयी...आपल्या जीवनाशी संबंधित गोष्टींची जास्तीत जास्त माहिती मिळवली तर आपल्या ज्ञानात भर पडते, आपल्याला माहित नसलेल्या वाटा कळतात, आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळतात व अडचणींवर मात करण्यासाठी नवनवीन मार्गही सापडतात. आणि हा त्रास घेतला तर काळजी कमी होते, टेन्शन कमी होतं!

मित्रांनो आणि हो या निकालाच्या निमित्ताने एक प्रार्थनाही तुम्हाला द्यायची आहे ती अशी- ध्येय प्रार्थना

जी परिस्थिती मी बदलू शकतो ती बदलण्याचे धैर्य व क्षमता मला लाभो! जी परिस्थिती मी बदलू शकत नाही तिला स्वीकारण्यासाठी मनाची प्रसन्नता मला लाभो!! आणि या दोन्हींमधील फरक जाणण्यासाठी विवेकबुद्धी मला लाभो!!!

म्हणजे काय ना कि एकदाचा जो निकाल लागेल तो लागेल. आपल्या हातात आता काही नाही. त्यासाठी आपण मनाची प्रसन्नता ठेऊन तो आनंदाने स्वीकारू या. परंतु यापुढे योग्य तो निर्णय घेऊन मागच्या चुका सुधारून आपण आपल्या करिअरला योग्य ती दिशा देऊ शकतो. त्यासाठी आपण कामाला लागायला हवं, नाही का? सो, निकालासाठी शुभेच्छा!

**महेंद्र बैसाणे मो. 86523 40256 www.bharukaka.com**